**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -४११ ००१

श्री. सुरेश मारुतराव जावळे
मु.पो.लोणंद, पोलीस स्टेशन शेजारी,
ता.खंडाळा, जि.सातारा **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक अभियंता व परिमंडळ अधिकारी,
पाटबंधारे संशोधन व विकास संचालनालय, पुणे-१ **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी** तथा मृद सर्वेक्षण अधिकारी,
पाटबंधारे संशोधन व विकास संचालनालय, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २५१ / सातारा |
| २ | विशेष अपील निर्गत कार्यक्रम | दि.२२.०८.२००८ |
| ३. | **उपस्थित**<br>**अपीलकर्ता** - श्री. सुरेश मारुतराव जावळे<br>मु.पो.लोणंद, पोलीस स्टेशन शेजारी,<br>ता.खंडाळा, जि.सातारा<br><br>**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक अभियंता<br>व परिमंडळ अधिकारी,<br>पाटबंधारे संशोधन व विकास संचालनालय, पुणे-१ श्री.क.म.शहा<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा मृद सर्वेक्षण अधिकारी,<br>पाटबंधारे संशोधन व विकास संचालनालय, पुणे-१ श्री.सुभाषचंद्र राजे | |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.०२.०७.२००७ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.२५.०७.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि.०४.०९.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि..१८.०९.२००७ |
| ८ | **<u>मूळ अर्जात मागणी केलेली माहिती</u>** - अधीक्षक अभियंता व संचालक, पाटबंधारे संशोधन व विकास संचालनालय व परिमंडळीय अधिकारी, पुणे परिमंडळ यांचे कार्यालयीन आदेश क्र.७०,दि.११.०५.२००७ मधील श्री.वि.ना.निगडे व श्री.जा.बा.साळुंखे, कनिष्ठ लिपिक यांची झालेली बदली कोणत्या शासन निर्णयानुसार रद्द केली? इतरांच्या बदल्या रद्द केल्या, मग माझा विनंती अर्ज असताना विनंती न मान्य करण्याची कारणे काय? | |

## विवेचन

स्वतःच्या व अन्य काही कर्मचाऱ्यांच्या बदल्यांबाबतची माहिती अपीलकर्ता श्री.सुरेश मारुतराव जावळे यांनी जन माहिती अधिकारी तथा मृद् सर्वेक्षण अधिकारी,पाटबंधारे संशोधन व विकास संचालनालय, पुणे यांच्याकडे मागितली होती. आपल्या बदल्या झाल्यानंतर कार्यमुक्त केल्याच्या आदेशाच्या प्रती मिळाल्या नाहीत व अन्य काही मुद्दयांची माहिती दिली गेली नाही, असे प्रतिपादन श्री.जावळे यांनी केले.

श्री.जावळे यांनी अनेक मुद्दयांमध्ये अभिप्राय व खुलासे यांची विचारणा केली आहे. आपली बदली का करण्यात आली, मंडळांतर्गत आपली बदली का करण्यात आली नाही, एखादा कर्मचारी एकाच जागेवर निवृत्त होतो हे नैसर्गिक न्यायास धरुन आहे का, अशा स्वरुपाचे प्रश्न त्यांनी विचारलेले आहेत. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत अशी विचारणा करता येत नसल्यामुळे ते मुद्दे वगळता इतर माहिती दिली आहे. पाटबंधारे संशोधन व विकास संचालनालयामध्ये एकूण ३२ परिमंडळे आहेत. त्यातील नेमक्या कोणत्या मंडळातील माहिती हवी आहे, हे अर्जात स्पष्ट नाही, असे जन माहिती अधिकारी तथा मृद् सर्वेक्षण अधिकारी,पाटबंधारे संशोधन व विकास संचालनालय, पुणे श्री.सुभाषचंद्र राजे यांनी नमूद केले.

जन माहिती अधिकारी तथा मृद् सर्वेक्षण अधिकारी, पाटबंधारे संशोधन व विकास संचालनालय, पुणे श्री.सुभाषचंद्र राजे व अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक अभियंता व परिमंडळ अधिकारी, पाटबंधारे संशोधन व विकास संचालनालय, पुणे श्री.क.म.शहा यांनी केलेली कार्यवाही योग्य असल्याचे उभय बाजूंनी सादर केलेल्या कागदपत्रांवरुन स्पष्ट होते.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

**पुणे**
**दि. : २३ -१०-२००९**

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे १

श्री. जयेश श्रीकृष्ण भागवत
२८७, मंगळवार पेठ, शाहू कला मंदिर शेजारी,
सातारा - ४१५ ००२ — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, सातारा

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याध्यापिका,
ब्रह्मेंद्रस्वामी हायस्कूल, धावडशी, ता.जि.सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २५२ / सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | २१.८.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता -** श्री. जयेश श्रीकृष्ण भागवत
२८७, मंगळवार पेठ, शाहू कला मंदिर शेजारी,
सातारा - ४१५ ००२

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, सातारा श्री. उदयसिंह भोसले

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याध्यापिका,
ब्रह्मेंद्रस्वामी हायस्कूल, धावडशी, ता.जि.सातारा श्रीमती माया नंदकुमार बेलसरे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ७.२.२०००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १६.३.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ३.४.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २०.५.२००७ |

८ **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**

ब्रह्मेंद्रस्वामी विद्यालय धावडशी येथील मुख्याध्यापक, शिक्षक, शिपाई यांचे कार्यालयाचे पगारपत्रक व हजेरीपत्रकाच्या प्रती

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.२१.८.२००८ रोजी आयोजित केलेल्या विशेष अपील निर्गत कार्यक्रमा त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने दि. २१.८.२००८ रोजी सुनावणी घेण्यात आली.

जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका श्री ब्रह्मेंद्रस्वामी हायस्कूल, धावडशी यांनी कळविलेल्या शुल्काची आपण केलेली मनीऑर्डर स्वीकारली नाही. अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, सातारा यांनी विलंब झालेला असतानाही शुल्क घेण्याचा निर्णय दिला. त्यानंतर माहिती दिली. परंतु सत्यप्रत करुन दिली नाही. तसेच 'माहिती न्यायालयीन कामकाजासाठी किंवा व्यक्तिगत कारणासाठी वापरु नये,' असा शिक्का मारला. तशा आशयाच्या पत्रासह माहिती दिली. आपली शुल्काची रक्कम झालेल्या खर्चासह परत मिळावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री. जयेश श्रीकृष्ण भागवत यांनी केली.

श्री. भागवत यांनी जानेवारी १९९८ ते डिसेंबर २००५ या काळातील विस्तृत माहिती मागितली होती. शासकीय कोषागारात चलनाने रक्कम भरण्याचे ठरलेले असतानाही व मनीऑर्डर स्वीकारु नये, असे बैठकीत ठरले असल्यामुळे मनीऑर्डर स्वीकारली नाही. अपिलीय प्राधिकाऱ्यांच्या निर्णयानंतर बँकेतील खाते क्रमांक कळवून शुल्क भरण्यास कळविले. शुल्क भरल्यानंतर त्वरित माहिती देण्यात आली. ज्यांची माहिती मागितली आहे त्यांच्याविरुध्द श्री. भागवत यांनी न्यायालयात फौजदारी दावा केला होता. त्याचा निकाल श्री. भागवत यांच्या विरुध्द गेल्याने हेतूपुरस्सर त्रास देण्यासाठी माहिती मागितलीआहे, म्हणून शर्त नमूद करुन माहिती दिली, असे लेखी व तोंडी प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका सौ. एम.एन. बेलसरे यांनी केले. सुमारे २०० महिन्यांच्या कालावधीतील कागदपत्रे असल्यामुळे सर्व पत्रे साक्षांकित केली नाहीत, असे नमूद करुन सौ. बेलसरे यांनी ती साक्षांकित करुन देण्याची तयारी

दर्शविली. मनीऑर्डरबाबतच्या निर्णयासह सौ. बेलसरे यांच्या निवेदनाला अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, सातारा श्री. उदयसिंह भोसले यांनी दुजोरा दिला.

माहिती नाकारण्याचा जन माहिती अधिकाऱ्यांचा उद्देश नाही, असे उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे यावरुन स्पष्ट होते. शुल्क व खर्चाची रक्कम परत मिळण्याची अपीलकर्त्यांची मागणी नाकारण्यात येत आहे. जन माहिती अधिकाऱ्यांनी कागदपत्रे साक्षांकित करुन द्यावीत, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार जन माहिती अधिकाऱ्यांनी पूर्तता केली.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुंवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २२.१०.२००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.अरविंद झिपरु चव्हाण
बी-१५, कमलनयन तिरुपतीनगर, वारजे, पुणे-५२ — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा जमाबंदी आयुक्त आणि संचालक,
भूमी अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा तालुका निरीक्षक भूमी अभिलेख,नंदुरबार,
टोकरतलाव रोड, ता.नंदुरबार

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २५४ / पुणे / २००७ |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२७.११.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.अरविंद झिपरु चव्हाण
बी-१५, कमलनयन तिरुपतीनगर, वारजे, पुणे-५२

**अपिलीय प्राधिकारी** तथा जमाबंदी आयुक्त आणि संचालक,
भूमी अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे प्रतिनिधी श्री.शिवाजी कोकणे

**जन माहिती अधिकारी** तथा तालुका निरीक्षक भूमी अभिलेख,नंदुरबार,
टोकरतलाव रोड, ता.नंदुरबार प्रतिनिधी आर.पी.पढेर

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १४.१२.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २९.१२.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.११.६.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांत एकमत न झाल्यामुळे दि.२७.११.२००८ रोजी अपिलाची सुनावणी घेण्यात आली.

जन माहिती अधिकाऱ्यांनी माहिती देण्यासाठी आकारलेल्या शुल्काचा तपशील मिळाला नाही. आपण व्यक्तीशः माहिती मागितली असताना टपालाने पाठविली, त्याचे प्रयोजन काय हे कळत नाही, म्हणून जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार यांच्यावर दंडात्मक कारवाई करावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री.अरविंद झिपरु चव्हाण यांनी केली.

श्री.चव्हाण यांनी ज़मिनीच्या मोजणी संदर्भातील कागदपत्रांच्या अनुषंगाने २६ प्रश्नांची माहिती मागितली होती. विहित मुदतीत त्यांनी शुल्क कळविले व माहिती त्वरित मिळावी म्हणून टपाल पार्सलने पाठविली. वस्तुत: मूळ अर्जदार वेगळा आहे, त्यांच्या वतीने सही करुन माहिती मागितली तरीही दिली. अपिलाच्या संदर्भात आयोगाने मागविलेल्या निवेदनामध्येही श्री.चव्हाण यांनी दि.८.१२.२००७ च्या निवेदनात वरील मुद्दे उपस्थित केले होते. त्यांनी मागणी केलेल्या कागदपत्रांचे शुल्क आकारण्यात आले. टपाल खर्च त्यांना आकारलेला नाही, असे तालुका निरीक्षक भूमी अभिलेख, नंदूरबार यांनी दि.१७.१२.२००७ च्या पत्रान्वये त्यांना कळविले, असे लेखी व तोंडी प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी यांचे प्रतिनिधी श्री.शिवाजी कोकणे यांनी केले. या संदर्भात श्री.चव्हाण यांनी प्रथम अपील केलेले नसल्याचे त्यांनी निदर्शनास आणले.

शुल्काचा तपशील न कळविल्याबद्दल आपली तक्रार असल्यामुळे आपण दुसरे अपील करु शकतो, असा मुद्दा श्री.चव्हाण यांनी मांडला आहे, तो रास्त आहे. तथापि खर्चाचा तपशील त्यांना कळवावा व माहिती स्वीकारण्याबाबतच्या अधिकारपत्राची प्रत त्यांनी सादर करावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार दि.२८.११.२००८ रोजी खर्चाचा तपशील त्यांना कळविण्यात आल्याचे जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक भूमी अभिलेख, नंदुरबार श्री.के.एस.पाटोळे यांनी दि.१२.१२.२००८ च्या अहवालान्वये संबंधित पत्रांच्या प्रतींसह आयोगास अवगत केले. श्री.चव्हाण यांनी अधिकारपत्राची प्रत सादर केलेली नाही.

उभय बाजूंनी सादर केलेली निवेदने व कागदपत्रे पाहता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. २२.१०.२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.माणिक दादू पवार
आसमंत वसवाडे हॉस्पिटल शेजारी,
सावंत प्लॉट, गुलमोहर कॉलनी, सांगली — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा निवासी उपजिल्हाधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय, सांगली — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा चिटणीस, महसूल शाखा,
जिल्हाधिकारी कार्यालय, सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २५५+४१३ / सांगली /२००७ |
| २ | सुनावणीची तारीख | दि.३०.८.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.माणिक दादू पवार
आसमंत वसवाडे हॉस्पिटल शेजारी, सावंत प्लॉट, गुलमोहर कॉलनी, सांगली

**अपिलीय प्राधिकारी** तथा निवासी उपजिल्हाधिकारी
जिल्हाधिकारी कार्यालय, सांगली श्री.आर.एस.शिंदे

**जन माहिती अधिकारी** तथा चिटणीस, महसूल शाखा,
जिल्हाधिकारी कार्यालय, सांगली श्री.एस.एस.सांगडे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.१३.१२.२००६ (अ.क्र.२५५)<br>दि. १३.१२.२००६ (अ.क्र.४१३) |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ९.३.२००७ (अ.क्र.२५५/४१३) |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १५.३.२००७(अ.क्र.२५५/४१३) |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २८.३.२००७(अ.क्र.२५५/४१३) |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>डब्ल्यूसी-३२ग-८/०४, जा.क्र.१८१२, दि.१७.१२.२००५ च्या वसुली प्रकरणी जिल्हाधिकाऱ्यांनी वसुलीची कार्यवाही केली अगर कसे?, कोणकोणत्या तारखेस, कोणती कार्यवाही, वसुली पूर्ण झाली आहे का?, नसल्यास त्याची कारणे, त्यासाठी कोण जबाबदार आहे व त्यांच्याविरुध्द केलेली कार्यवाही, वसुली झाली असल्यास न्यायालयात का जमा केली नाही, कधीपर्यंत पूर्ण करणार? | |

## विवेचन

न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार जिल्हाधिकारी, सांगली यांनी वसुलीची कार्यवाही केली किंवा नाही याबाबत मागितलेली माहिती खोटी व अपूर्ण दिली. अपिलीय प्राधिकाऱ्यानी अपील फेटाळले. तहसीलदार, मिरज यांना व त्यांच्याकरवी मंडल अधिकारी, सांगली यांना वसुली करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. सध्या वसुलीची कार्यवाही चालू आहे, असे जन माहिती अधिकारी तथा चिटणीस, महसूल शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय, सांगली यांनी कळविले. 'वसुली झाली नसल्यास त्याची कारणे काय आहेत, वसुली न होण्यास कोण जबाबदार आहे, वसुली झाली नसल्यास जिल्हाधिकारी ती पूर्ण करणार आहेत का, व किती मुदतीत,' याचे उत्तर दिले जात नाही. खुलासा, मत, अभिप्राय याची मागणी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत करता येत नाही, असे कळवून जन माहिती अधिकाऱ्यांनी याबाबतची माहिती दिलेली नाही. जिल्हाधिकारी कार्यालयाने फक्त संबंधित कार्यालयाकडे पत्र पाठवून गप्प बसायचे नाही, तर त्या पत्राबाबत पाठपुरावा करुन न्यायालयाच्या हुकमाची अंमलबजावणी लौकरात लौकर

होण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत, ते का केले नाहीत, हे जाणून घेण्याचा नागरिकांना हक्क आहे, असे लेखी प्रतिपादन अपीलकर्ता श्री.माणिक दादू पवार यांनी केले आहे.

वसुलीच्या कार्यवाहीबाबतची माहिती देण्यात आली आहे. खुलासा अथवा संकल्पित कार्यवाहीच्या गृहितावर आधारित माहितीची मागणी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत 'माहिती' ठरत नाही. संदर्भित प्रकरणातील वसुलीबाबतच्या सद्यस्थितीची अधिक तपशिलवार माहिती जन माहिती अधिकारी तथा चिटणीस, जिल्हाधिकारी कार्यालय, सांगली श्री.एस.एस.सांगडे यांनी अपीलकर्त्यास देऊन आयोगाला अहवाल सादर करावा, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपिले निकाली काढण्यात येत आहेत.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.१६.१०.२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.माणिक दादू पवार
आसमंत बसवाडे हॉस्पिटल शेजारी,
सावंत प्लॉट, गुलमोहर कॉलनी, सांगली — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा निवासी उपजिल्हाधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय, सांगली — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा चिटणीस, महसूल शाखा,
जिल्हाधिकारी कार्यालय, सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २५५+४१३ / सांगली /२००७ |
| २ | सुनावणीची तारीख | दि.३०.८.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.माणिक दादू पवार
आसमंत बसवाडे हॉस्पिटल शेजारी, सावंत प्लॉट, गुलमोहर कॉलनी, सांगली

**अपिलीय प्राधिकारी** तथा निवासी उपजिल्हाधिकारी
जिल्हाधिकारी कार्यालय, सांगली श्री.आर.एस.शिंदे

**जन माहिती अधिकारी** तथा चिटणीस, महसूल शाखा,
जिल्हाधिकारी कार्यालय, सांगली श्री.एस.एस.सांगडे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.१३.१२.२००६ (अ.क्र.२५५)<br>दि. १३.१२.२००६ (अ.क्र.४१३) |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ९.३.२००७ (अ.क्र.२५५/४१३) |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १५.३.२००७(अ.क्र.२५५/४१३) |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २८.३.२००७(अ.क्र.२५५/४१३) |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>डब्ल्यूसी-३२ग-८/०४, जा.क्र.१८१२, दि.१७.१२.२००५ च्या वसुली प्रकरणी जिल्हाधिकाऱ्यांनी वसुलीची कार्यवाही केली अगर कसे?, कोणकोणत्या तारखेस, कोणती कार्यवाही, वसुली पूर्ण झाली आहे का?, नसल्यास त्याची कारणे, त्यासाठी कोण जबाबदार आहे व त्यांच्याविरुध्द केलेली कार्यवाही, वसुली झाली असल्यास न्यायालयात का जमा केली नाही, कधीपर्यंत पूर्ण करणार? | |

## विवेचन

न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार जिल्हाधिकारी, सांगली यांनी वसुलीची कार्यवाही केली किंवा नाही याबाबत मागितलेली माहिती खोटी व अपूर्ण दिली. अपिलीय प्राधिकाऱ्यानी अपील फेटाळले. तहसीलदार, मिरज यांना व त्यांच्याकरवी मंडल अधिकारी, सांगली यांना वसुली करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. सध्या वसुलीची कार्यवाही चालू आहे, असे जन माहिती अधिकारी तथा चिटणीस, महसूल शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय, सांगली यांनी कळविले. 'वसुली झाली नसल्यास त्याची कारणे काय आहेत, वसुली न होण्यास कोण जबाबदार आहे, वसुली झाली नसल्यास जिल्हाधिकारी ती पूर्ण करणार आहेत का, व किती मुदतीत,' याचे उत्तर दिले जात नाही. खुलासा, मत, अभिप्राय याची मागणी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत करता येत नाही, असे कळवून जन माहिती अधिकाऱ्यांनी याबाबतची माहिती दिलेली नाही. जिल्हाधिकारी कार्यालयाने फक्त संबंधित कार्यालयाकडे पत्र पाठवून गप्प बसायचे नाही, तर त्या पत्राबाबत पाठपुरावा करुन न्यायालयाच्या हुकमाची अंमलबजावणी लौकरात लौकर

होण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. ते का केले नाहीत, हे जाणून घेण्याचा नागरिकांना हक्क आहे, असे लेखी प्रतिपादन अपीलकर्ता श्री.माणिक दादू पवार यांनी केले आहे.

वसुलीच्या कार्यवाहीबाबतची माहिती देण्यात आली आहे. खुलासा अथवा संकल्पित कार्यवाहीच्या गृहितावर आधारित माहितीची मागणी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत 'माहिती' ठरत नाही. संदर्भित प्रकरणातील वसुलीबाबतच्या सद्यस्थितीची अधिक तपशिलवार माहिती जन माहिती अधिकारी तथा चिटणीस, जिल्हाधिकारी कार्यालय, सांगली श्री.एस.एस.सांगडे यांनी अपीलकर्त्यास देऊन आयोगाला अहवाल सादर करावा, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपिले निकाली काढण्यात येत आहेत.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.१६.१०.२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -१

श्री.जया एन.शेट्टी
२४०, पर्वती पायथा, पुणे-३० **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सचिव,
हचिंग महाविद्यालय, ७,फेरी रोड, पुणे -४० **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी** तथा प्राचार्य,
हचिंग महाविद्यालय, ७,फेरी रोड, पुणे -४०

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २५५४/ पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१२.०८.२००९ |
| **३.** | **उपस्थित**<br><br>**अपीलकर्ता** - श्री.जया एन.शेट्टी<br>२४०, पर्वती पायथा, पुणे-३०<br><br>**अपिलीय प्राधिकारी** तथा सचिव,<br>हचिंग महाविद्यालय,<br>७,फेरी रोड, पुणे -४०<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा - | |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.११.०६.२००८ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.२०.०८.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि.०७.०८.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. |
| ८ | **<u>मूळ अर्जात मागणी केलेली माहिती</u>**<br>२००४-२००६ व २००७-२००८ या शैक्षणिक वर्षी पहिली ते सातवी प्रवेश पध्दत काय? व वीज व पाणी बिलाबाबतचे मुद्दे | |

## विवेचन

हचिंग्ज हायस्कूलला वीज, पाणी बिलाबाबत सवलतीचा दर आहे, कॅन्टोन्मेंट बोर्डाने जमीन सवलतीने दिलेली आहे व शिक्षण खात्याचे नियंत्रण आहे तरीही आपल्या शाळेला माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू होत नसल्याचे सांगून शाळा प्रवेशाबद्दलची माहिती नाकारली आहे, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.जया एन.शेट्टी यांनी केली.

संस्थेला सरकारी अनुदान मिळत नाही. बीआरसी मेथॉडिस्ट चर्च इन इंडिया यांच्यातर्फे ही शाळा चालविली जाते. त्याला सरकारचे अनुदान नाही. कॅन्टोन्मेंट बोर्डाकडून भाडेपट्टयाने घेतलेली जमीन असून वीज, पाणी याबाबतची बिले संस्था भरते, नियमित दराने दिल्ली बोर्डाच्या कक्षेतील शाळा आहे, असे प्रतिपादन संस्थेचे सचिव श्री.रेव्हरंड सी. सेलव्हीन व वकील श्री.सचिन कटारीया यांनी केले या संदर्भातील पुराव्याची कागदपत्रे आठ दिवसांत सादर करण्याचा मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिला. त्यानुसार ॲड.सचिन कटारीया यांनी दि.१९.०८.२००९ च्या पत्रान्वये सादर केलेल्या कागदपत्रांचे अवलोकन करता शाळा 'सार्वजनिक प्राधिकरण' ठरत नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

**पुणे**
**दिनांक : १५ / १०/२००९**

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे १

श्री.संतोष पोपट खरे
मु.पो.खडकवासला, नवीन आय.ऐ.टी.रोड,
खडकवासला गाव, ता.हवेली, जि.पुणे **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सचिव,
सौ. निर्मलाताई थोपटे शिक्षणशास्त्र महाविद्यालय,
भोर, जि. पुणे **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी** तथा प्राचार्य,
सौ. निर्मलाताई थोपटे शिक्षणशास्त्र महाविद्यालय,
भोर, जि. पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २५८८अ /पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | १९.६.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** - श्री.संतोष पोपट खरे
मु.पो.खडकवासला, नवीन आय.ऐ.टी.रोड,
खडकवासला गाव, ता.हवेली, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २.९.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. -- |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ८.९.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. -- |

८ **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**

अंतर्गत गुण मिळण्यासाठी महाविद्यालयाकडे सादर केलेल्या सर्व विषयांच्या फाईल्स - माहितीसाठी मिळणेबाबत

## विवेचन

'अंतर्गत गुण मिळण्यासाठी महाविद्यालयाकडे सादर केलेल्या सर्व फाईल्स माहितीसाठी मिळणेबाबत' अशी माहिती अपीलकर्ता श्री.संतोष पोपट खरे यांनी जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य, सौ. निर्मलाताई थोपटे शिक्षणशास्त्र महाविद्यालय, भोर यांच्याकडे मागितली होती. आपल्या मागणीची पूर्तता जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांच्या पातळीवर झाली नाही, म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

सौ.निर्मलाताई थोपटे शिक्षणशास्त्र महाविद्यालय, भोर, जि. पुणे या महाविद्यालयात आपण बी.एड. परीक्षा दिली. या परीक्षेत प्राचार्य व विद्यापीठाच्या अधिष्ठाता डॉ. स्मिता काळे यांनी आपल्याला जाणून बुजून नापास केले. आपण मागितलेली माहिती मिळाली नाही. कारण रेकॉर्ड गायब केले आहे व आपले दोन वर्षांचे नुकसान झाले आहे. त्याबद्दल त्यांच्यावर कारवाई व्हावी, अशी मागणी श्री. खरे यांनी केली.

श्री. खरे यांचा अर्ज महाविद्यालयाला मिळालेला नाही, त्यामुळे उत्तर देता आले नाही. त्यांनी नमूद केलेल्या अपिलाच्या तारखेला त्यांनी पाठविलेल्या पाकिटात एक कोरा कागद होता, त्यामुळे त्यावर कार्यवाही करता आली नाही, असे प्राचार्य डॉ. स्मिता काळे व अपिलीय प्राधिकारी तथा सचिव, सौ.निर्मलाताई थोपटे शिक्षणशास्त्र महाविद्यालय, भोर, जि. पुणे यांचे प्रतिनिधी श्री. रामचंद्र कोंडीबा साळुंके यांनी 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'तील प्रपत्रात नमूद केले आहे.

अभिलेख गहाळ केले आहेत की नाही, संबंधितांवर कारवाई करावी, या बाबींचा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कक्षेत समावेश होत नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**( विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २० .१०.२००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.गणेश सरदार चव्हाण
प्लॉट नं.१४, एस.टी.स्टँडच्या पाठीमागे, कोल्हापूर रोड, सांगली — अपीलकर्ता

विरुध्द

**अपिलीय प्राधिकारी** तथा निबंधक, कोल्हापूर विभाग, जि.कोल्हापूर

**जन माहिती अधिकारी** तथा जिल्हा उपनिबंधक, कोल्हापूर विभाग, जि.कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २६२ / सांगली |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२९.८.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.गणेश सरदार चव्हाण
प्लॉट नं.१४, एस.टी.स्टँडच्या पाठीमागे, कोल्हापूर रोड, सांगली

**अपिलीय प्राधिकारी** तथा निबंधक, कोल्हापूर विभाग, जि.कोल्हापूर

**जन माहिती अधिकारी** तथा जिल्हा उपनिबंधक, कोल्हापूर विभाग, जि.कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १५.२.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २३.२.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १२.४.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २०.३.२००७ |

| ८ | मूळ अर्जात मागणी केलेली माहिती<br><br>माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची प्रत (जोडपत्र-अ) सोबत जोडली आहे. |
|---|---|

## विवेचन

जनलक्ष्मी नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित ही संस्था सन २००५ मध्ये बंद पडल्यानंतर उपनिबंधक, सहकारी संस्था यांनी कोणताही पुरावा नसताना या पतसंस्थेच्या संचालकांची नावे बेकायदेशीररित्या जाहीर केली आहेत. त्या यादीत आपले नाव असून त्याबाबतची माहिती जन माहिती अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, सांगली यांच्याकडे मागितली होती. परंतु संस्थेवर सहकार खात्याचे प्रशासक असताना त्यांनी आपला अर्ज संस्थेकडे वर्ग केला व संस्थेकडून माहिती घेण्यास कळविले. अपिलीय प्राधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, कोल्हापूर यांनीही संस्थेच्या प्रशासकाकडून माहिती घेण्याच्या निर्णयावर शिक्कामोर्तब करून अपील फेटाळले. उपनिबंधकांच्या कार्यालयात सर्व कागदपत्रे असतानाही जाणीवपूर्वक दिली जात नाहीत. तसेच कागदपत्रांबाबतची चौकशीही केली जात नाही. आपल्याला न विचारता संस्थेच्या संचालक मंडळात आपले नाव घालण्यात आले होते व ते वगळण्यास सांगून राजीनामा दिल्यानंतरही बेकायदेशीरपणे कायम ठेवले जात आहे. त्यामुळे आपल्याला त्रास होत आहे, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री.गणेश सरदार चव्हाण यांनी केले.

माहिती संस्था स्तरावरील असल्यामुळे संस्थेकडून माहिती घेण्याबाबत श्री.चव्हाण यांना कळविले. तसेच उपलब्ध कागदपत्रे दिली. माहिती देण्याबाबत प्रशासकांनाही कळविले. संचालक मंडळात श्री.चव्हाण यांचे नाव असणे कायदेशीर की बेकायदेशीर इत्यादी बाबी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कक्षेतील नाहीत. तसेच विविध स्वरूपाचे दावे उपरोक्त पतसंस्थेबाबत चालू आहेत. त्या अनुषंगाने श्री.चव्हाण यांच्या मुद्दयांवर भाष्य करणे योग्य ठरणार नाही, असे

प्रतिपादन जन माहिती अधिकारी श्री.बी.जी.पाटील व अपिलीय प्राधिकारी श्री.आर.आर.महाजन यांनी केले.

संबंधित पतसंस्थेवर सहकार खात्याचे प्रशासक कार्यरत असताना त्यांच्याकडून माहिती प्राप्त करून घेऊन जन माहिती अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था यांनी अपीलकर्त्यास देणे आवश्यक आहे. देय माहिती एक आठवड्यात द्यावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

(१) अपील अंशत: मान्य.

(२) आयोगाच्या मौखिक आदेशानुसार केलेल्या कार्यवाहीचा अहवाल जन माहिती अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, सांगली श्री.आर.आर.महाजन यांनी दि.२०.११.२००९ पर्यंत आयोगाला सादर करावा.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
पुणे खंडपीठ

**पुणे**
दि.६ .११.२००९

511

# जोडपत्र 'अ'

(पहा नियम ३)

येथे रू.१०/- चा न्यायालय फी मुद्रांक चिकटवावा.

## माहितीचा अधिकार नियम, २००५ अन्वये माहिती मागविण्याचा अर्जाचा नमुना

प्रति,

शासकीय माहिती अधिकारी,
(कार्यालयाचे नांव व पत्ता)
प्रशासक जनकल्याण नागरी
सह. पतसंस्था मर्या. सांगली

१) अर्जदाराचे संपूर्ण नांव : श्री गणेश सरदार चव्हाण

२) पत्ता : गणेश कॉलनी, प्लॉट नं. 15
एस. टी. स्टँड पाठीमागे सांगली.

३) आवश्यक असलेल्या माहितीचा तपशील : जनकल्याण नागरी सह. पतसंस्था मर्या.

(एक) माहितीचा विषय : या पतसंस्था संदर्भात

(दोन) माहितीशी संबंधित कालावधी :

(तीन) आवश्यक असलेल्या माहितीचे वर्णन : ① गणेश सरदार चव्हाण हे जनकल्याण पतसंस्थेचे सभासद आहेत काय? ② सभासद असल्यास सभासद क्रमांक? ③ संचालक म्हणून केव्हापासून काम केले? ④ संचालक म्हणून आपल्या कार्यालयाकडे असलेल्या प्रस्तावाची नक्कल ⑤ संचालक म्हणून काम करणेस संमती पत्र? ⑥ संस्था सोसायटी अधिकारी प्रशासक नेमले पर्यंत संचालक यादी -

(चार) माहिती टपालाद्वारे किंवा व्यक्तीशः आवश्यक आहे किंवा कसे ? (प्रत्यक्ष टपाल खर्च अतिरीक्त शुल्कामध्ये समाविष्ट केला जाईल) : व्यक्तीशः
9822407864,
0233-2531665

(पाच) टपालाद्वारे असे त्याबाबतीत (सर्वसाधारण, नोंदणीकृत किंवा शीघ्र) :

४) अर्जदार हा दारिद्र्यरेषेखालील आहे का ? (जर असेल तर त्याबाबतच्या पुराव्याची छायाप्रत जोडावी) : नाही

ठिकाण : सांगली

दिनांक : 15/2/07

अर्जदाराची स्वाक्षरी

---

* विषयाचा स्थूल प्रवर्ग दर्शविण्यात यावा (जसे शासकीय जमीन मंजुरी/सेवाबाबी/परवाने इत्यादी)

* ज्या कालावधी संबंधातील माहिती आवश्यक आहे तो कालावधी दर्शविणे.

* माहितीचा विशेष तपशील दर्शविणे आवश्यक आहे.

Received